नियमित दिवाणी दावा क्र.२१/२०१६ मधील
निशाणी क्र.६१ वरील आदेश
(शत्रुघ्न वाडेकर वि. अरविंद पारकर)

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी पुन्हा कोर्ट कमिशन होणेकरीता म्हणून दिला आहे.

२. अर्ज कथने संक्षिप्ततेत खालीलप्रमाणे-

कोर्ट कमिशनर यांनी दिलेला अहवाल काही बाबतीत विश्वासपात्र वाटत नाही. सदर अहवालावरुन असे दिसते की, जनरेटर बंद असताना वादीच्या घराजवळ तीव्र व मोठा आवाज होत असतो आणि जनरेटर सुरु केल्यानंतर मात्र आवाजाची पातळी कमी होते. परिणामी सदर मोजमापे अनाकलनीय, त्यापेक्षा अनैसर्गिक आहेत व मान्य नाहीत. ती मापे पुन्हा घेणे गरजेचे आहे. रात्रीच्या वेळी जनरेटरचा आवाज मोजलेला नाही. प्रतिवादीच्या रिसॉर्टमध्ये १५ ते २० खोल्या असून प्रत्येक खोली ए.सी. आहे. सर्व खोल्यांमधील लाईट, पंखे, ए.सी. चालू ठेवून वीज पुरवठा बंद पाडून जनरेटर चालू होतो त्यावेळची आवाजाची मापे घेणे गरजेचे होते तशी मापे घेणे गरजेचे होते तशी मापे घेतलेली नाहीत. जनरेटर सुरु झाल्यानंतर जमीन हादरते त्याबाबत अहवालामध्ये उल्लेख केलेला नाही. आवाजाचे मोजमाप समान वेळोमध्ये घेतलेले नाही. तरी पूर्वीचे खर्चामध्ये वरील त्रुटी दूर करुन जरुर ती मोजमापे करण्याबाबत आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देवून प्रस्तुत अर्जास तीव्र विरोध केलेला आहे. प्रतिवादींचे म्हणणे असे की, सदरचा अर्ज वादी याने पश्चात बुध्दीने दिला असून केवळ वेळकाढूपणा करीता दिला आहे. अर्जाचे परिच्छेद क्र.१ मध्ये वादीने सदरच्या रिपोर्टबाबत शंका उत्पनन केली असून सदरची बाब हा पुराव्याचा भाग असून त्या तक्रारीकरीता पुन्हा कमिशन नेमण्याची तरतुद कायदयात नाही. परिच्छेद क्र.२ मध्ये मांडलेली तक्रार ही हास्यास्पद असून सदरची मागणी मान्य केल्यास पुढे वादी ठराविक वेळ सांगूनही रिपोर्ट अमान्य करु शकेल असे या अर्जावरुन दिसते. परिच्छेद क्र.३ मध्ये मांडलेली तक्रार वादीने मुळ अर्जातच मांडलेली नाही. सबब, आता ती तक्रार करता येणार नाही. परिच्छेद क.४ मध्ये

मांडलेली तक्रार हा विषय या खात्याचे अधिकारातील नाही. परिच्छेद क्र.५ मध्ये मांडलेली तक्रार कळण्यापलिकडील असून त्यात वादीला नेमके काय म्हणायचे आहे याचा सविस्तर उल्लेख अर्जात नाही. परिच्छेद क्र.६ मधील तक्रार ही खोडसाळ असून कायद्यात तशी कोणतीही तरतूद नाही. निशाणी क्र.५८ येथे वादीचा पुरावा नोंदविला आहे. त्याचे परिच्छेद क्र.१२ मध्ये वादीने सदर कोर्ट कमिशनबाबत आपली तक्रार नाही असे म्हटले असून त्याच जबाबात आपण म्हणणे देखील दाखल न केल्याचे वादीच कबुल करीत आहे. वरील म्हणणे सहानुभूतीने विचारात घेवून सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करावा.

४.     प्रस्तुत अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंकडील युक्तीवाद सविस्तर ऐकला. त्यावरुन प्रस्तुत अर्जाचे निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर नमूद केलेल्या उपस्थित झालेल्या मुद्दयांचे निष्कर्ष त्याप्रमाणे नोंदविणेत आलेले आहेत.

| **अ.क्र.** | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दावा मिळकतीची वस्तुस्थितीची पाहणी करणेकरीता पुन्हा कोर्ट कमिशन करणे आवश्यक आहे का? | होकारार्थी. |
| २. | वादी पुन्हा करुन मागत असलेले कोर्ट कमिशन पूर्वीच्या कोर्ट कमिशन फी मध्ये होवून मिळणेस पात्र आहे काय ? | नकारार्थी. |
| ३. | काय आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो. |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्र.१ करिता-**

**५.**     अर्जाच्या गुणवत्तेवर चर्चा करण्यापूर्वी मी येथे नागरी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या कलम ७५ आणि आदेश XXVI नियम ९ चे पुनरुच्चारण करणे आवश्यक वाटते.

**कलम :– ७५ : –** कमिशन जारी करण्याचा न्यायालयाचा अधिकार. विहित केलेल्या अटी आणि मर्यादांच्या अधीन राहून, न्यायालय कमिशन जारी करू शकते–

(अ) कोणत्याही व्यक्तीची तपासणी करणे;
(ब) स्थानिक चौकशी करणे;
(क) हिशेब तपासणे किंवा समायोजित करणे; किंवा
(ड) विभाजन करणे;
(इ) वैज्ञानिक, तांत्रिक किंवा तज्ञ चौकशी करणे;
(फ) जलद आणि नैसर्गिक क्षय होण्याच्या अधीन असलेल्या आणि खटल्याचा निर्णय होईपर्यंत न्यायालयाच्या ताब्यात असलेल्या मालमत्तेची विक्री करणे;
(ग) कोणताही मंत्रीगत कायदा करणे

**६.** एकंदरीत अर्ज, म्हणणे व दोन्ही बाजूंकडील युक्तीवादाचे एकत्रात अवलोकन केले. वादींतर्फे वकीलांनी युक्तीवादा दरम्यान सांगितले की, सदर पुन्हा होणाऱ्या कोर्ट कमिशनकामी कोर्ट कमिशनर यांचा येणे जाणेचा खर्च हा वादी करणेस तयार आहे तरी न्यायाचे कारणास्तव अर्ज मंजूर करणेत यावा. तसेच वादीतर्फे वकीलांनी असाही युक्तीवाद केला की, सदर पुन्हा होणारे कोर्ट कमिशन हे पूर्वी कोर्ट कमिशनकरीता अदा केलेल्या फी मध्ये करण्यात यावे. प्रतिवादींतर्फे वकीलांनी पुन्हा कोर्ट कमिशन करण्याची कोणतीही आवश्यकता नसल्याचे त्यांचे युक्तीवादाचे दरम्यान सांगून अर्जास तीव्र हरकत नोंदविली.

**७.** प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसते की, याकामी निशाणी क्र.२४ येथे वादी यांनी यापूर्वी दावा मिळकतीमध्ये कोर्ट कमिशन होवून मिळावे याकरीता अर्ज दाखल केला होता व तो अर्ज मंजूर करणेत आला होता. सदर निशाणी क्र.२४ वरील आदेशान्वये प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी प्रदेश येथील अधिकारी यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात आली होती. सदर प्रमाणे, दावा मिळकतीचे कोर्ट कमिशन करुन त्यांनी त्याबाबत अहवाल दिलेला आहे, तो याकामी निशाणी क्र.४० येथे दाखल आहे. अशी परिस्थिती असताना वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज देवून त्यामध्ये नमुद कारणांस्तव दावा मिळकतीमध्ये पुन्हा कोर्ट कमिशन होवून मिळावे अशी विनंती केलेली आहे.

८. याकामी दाखल कोर्ट कमिशन यांचे निशाणी क्र.४० कडील अहवालाचे पुर्नअवलोकन केले असता त्यामध्ये परिच्छेद क्र.५ मध्ये पाच वेळा वेगवेगळया ठिकाणांहून सदर जनरेटरच्या आवाजाची मोजमापे घेतल्याबाबत नमुद केलेले असून त्यासोबत जोडपत्र-२ जोडलेले आहे. परंतू, वादीच्या प्रस्तुत अर्जाचा विचार करता त्यामध्ये वादी यांनी नमूद केले की, जनरेटर बंद असताना आवाज जास्त येतो. सदर बाबीचा साकल्याने विचार करता त्यामध्ये कोणतीही स्पष्टता दिसून येत नाही. तर वादी यांनी पुढे सदर जनरेटरचा आवाज रात्रीच्या वेळी मोजलेला नसल्याचे तसेच प्रतिवादींच्या दावा मिळकतीवरील रिसॉर्टमध्ये वीजेवर चालणारी उपकरणे चालू ठेवून वीज पुरवठा बंद पाडून जनरेटर चालू होतो त्यावेळी जनरेटरच्या आवाजाचे मोजमाप घेणे आवश्यक असल्याचे म्हटलेले आहे. सदर वादींनी नमुद केलेल्या बाबींमध्ये तथ्य दिसून येते. त्यावरुन याकामी वादींनी उठवलेल्या सदर प्रश्नांचा विचार करता याकामी दाखल असलेला निशाणी क्र.४० कडील अहवाल हा परिपूर्ण असल्याचे म्हणता येणार नाही. वादी यांनी सदर अर्जामध्ये परिच्छेद क्र.४ मध्ये नमुद केलेली बाब ही निशाणी क्र.२४ अन्वये नेमलेल्या कोर्ट कमिशन यांचे अखत्यारीत येत नाही. त्यामुळे सदर बाबीचा विचार करता येणार नाही तसेच वादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये परिच्छेद क्र.५ नमुद केलेल्या बाबीचा विचार करता त्यातून वादीला नेमके काय म्हणायचे आहे याबाबत कोणतीही स्पष्टता दिसून येत नाही.

९. प्रस्तुत अर्जाचे अवलोकनावरुन असे स्पष्ट होते की, वादींना निशाणी क्र.२४ कडील कोर्ट कमिशनचा अहवाल मान्य नाही असे वादींचे कोठेही म्हणणे नाही. परंतू, वादींनी प्रस्तुत अर्जामध्ये नमुद केलेल्या बाबींकरीता पुन्हा कोर्ट कमिशन व्हावे अशी विनंती वादी यांनी केलेली आहे. वादी यांच्या अर्जाचा विचार केला असता निशाणी क्र.२४ कडील अहवालामध्ये काही परिस्थितीमध्ये वादीचे घरातून सदर जनरेटरची ध्वनी तीव्रता नोंदविलेली नसल्याचे दिसून येते. जसे की, दावा

मिळकतीमधील वादीचे घरातून प्रतिवादींचे सदर रिसॉर्टमधील ज्या वेळी विदयुतप्रवाह खंडित झालेला असेल व त्यावेळी सर्व विद्युत उपकरणे ही जनरेटरवरच चालू असतात आणि जनरेटवर त्याचा भार येवून त्यावेळी त्या जनरेटरची ध्वनी तीव्रता मोजणे तसेच सदर रिसॉर्टमध्ये ज्यावेळी विद्युत प्रवाह खंडित झालेला असेल परंतू, प्रतिवादी यांचे सदर रिसॉर्टमधील काही विद्युत उपकरणे जनरेटरवर चालू असताना त्याची ध्वनी तीव्रता मोजणे देखील आवश्यक आहे. सदर चर्चिल्याप्रमाणे जनरेटरची तीव्रता ही एका विशिष्ट कालावधीकरीता मोजणे आवश्यक आहे. त्यावरुन वादी यांच्या घरात प्रतिवादींच्या रिसॉर्टमधील जनरेटरवर चालणाऱ्या विदयुत उपकरणांमुळे सदर जनरेटरमुळे होणाऱ्या ध्वनी तीव्रतेमुळे किती व कोणत्या प्रकारे त्याच्या तीव्रतेचा परिणाम होतो हे स्पष्ट होणार आहे. त्यामुळे वादीचे सदर अर्जात काही प्रमाणात तथ्य वाटते. त्याकरीता म्हणून वादीचा अर्ज मंजूर केल्यास दावा गुणदोषांवर निकाली होणेस व जलदगतीने चालण्यास मदत होणार आहे. अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान उद्भवत नाही. त्यामुळे अर्ज मंजूर करणे उचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करणेत येतो.

**१०.** प्रस्तुत अर्जामधील वादींनी काही आवश्यक त्या नमुद केलेल्या बाबींचा विचार केल्यास दावा मिळकतीमध्ये कोर्ट कमिशन पुन्हा करणे आवश्यक व जरुरीचे वाटते. मुळात हा दावा वादी यांनी सदर जनरेटर प्रतिवादी यांनी तेथून हटवावा अशा आज्ञार्थी व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे दाव्याचा अंतिम योग्य गुणदोषांवर निकाल होणेकरीता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेकरीता पात्र असल्याचे दिसून येते. सबब, मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी देण्यात येते.

**<u>मुद्दा क्रमांक २ करिता</u> :–**

**११.** वादींनी प्रस्तुतकामी ते पुन्हा करुन मागत असलेले कोर्ट कमिशन हे पूर्वीच्या कोर्ट कमिशन फी मध्ये करण्यात यावे असे अर्जात नमुद केल्याचे दिसून

येते. तर युक्तीवादरम्यान कोर्ट कमिशनर यांचे येणे-जाणेचा खर्च करण्यास वादी तयार असल्याचे त्यांचे वकीलांमार्फत सांगण्यात आले. परंतू, वादी यांचे सदर मागणीचा विचार केला असता प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी त्यांचे मागण्यांकरीता केलेला असल्यामुळे कोर्ट कमिशनकरीता आकारण्यात येणारी फी वादीने अदा करणे कायद्याच्या दृष्टीने योग्य होणारे आहे. त्यामुळे मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविणेत येतो.

**मुद्दा क्रमांक ३ करिता :–**

**१२.** मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष होकारार्थी व मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविणेत आलेले आहेत. सबब, मुद्दा क्रमांक ३ च्या उत्तरात खालीलप्रमाणे आदेश पारित करणेत येतो.

आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाण क्र.६१) अंशतः मंजूर करणेत येतो.

२. प्रस्तुत अर्जान्वये वादीच्या मागणीप्रमाणे दावा मिळकतीमध्ये निशाणी क्र.४० कडील अहवालाच्या अनुषंगाने पुन्हा कोर्ट कमिशन करणेस याद्वारे परवानगी देणेत येते.

३. प्रदुषण नियंत्रण मंडळ रत्नागिरी विभागातील अधिकाऱ्याची न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

४. प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयातील संबंधित अधिकारी यांना मौजे आंबोळगड, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील सर्व्हे क्र.१४ हिस्सा क्र.६/१२ आणि ग्रामपंचायत घर क्र.२१४ येथे भेट देण्याचे आणि प्रतिवादीच्या मालमत्तेत ठेवलेल्या वादीच्या घरातील जनरेटरचा आवाज डेसिबल मोजण्योच निर्देश देण्यात येत आहेत.

५. प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयातील अधिकारी यांना कमिशनच्या कामासाठी भेटीची तारीख व वेळ आणि कमिशनच्या कामाच्या वेळी

उपस्थित राहण्यास सांगितल्यानंतर दोन्ही पक्षांना नोटीस दिल्यानंतर भेट देण्याचे निर्देश देण्यात येतात.

६. दोन्ही पक्षांनी न्यायालयीन आयुक्तांसमोर हजर राहण्याचे निर्देश देण्यात येतात.

७. प्रदुषण नियंत्रण मंडळ कार्यालयाचे सदर अधिकारी यांनी वादी यांचे घरातून प्रतिवादी यांचे रिसॉर्टमधील सदर जनरेटरवरुन खालीलप्रमाणे एकूण किमान तीन वेळा परिस्थितीत ध्वनी तीव्रता मोजावी व तसा अहवाल २६/०९/२०२५ रोजी किंवा तत्पूर्वी त्यांचा अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात येतात:

अ. सदर जनरेटर बंद स्थितीत असताना;

ब. विदयुत पुरवठा खंडित असताना सदर रिसॉर्टमधील निम्मी विद्युत उपकरणे जनरेटरवर चालू असताना;

क. विदयुत पुरवठा खंडित असताना सदर रिसॉर्टमधील सर्व विदयुत उपकरणे जनरेटरवर सुरु असताना;

८. वादी यांना तात्काळ कोर्ट कमिशनकामी संबंधित कार्यालयात कोर्ट कमिशन फी जमा करण्याचे व त्याची पावती न्यायालयात सादर करण्याचे निर्देश देण्यात येतात.

९. त्यानुसार प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी प्रदेश यांना कमिशनचे पत्र जारी करण्यात यावे.

१०. पक्षकारांनी सदर आदेशाची समज घ्यावी.

SWARANJALI SUDHAKAR HAKKE

Digitally signed by SWARANJALI SUDHAKAR HAKKE
Date: 2025.09.17 17:38:45 +0530

**(**एस**.** एस**.** हाके**)**
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**,**
राजापूर**.**

दिनांक**-** ०४**/**०९**/**२०२५

**CERTIFICATE**

"Order Below Exh.61 in :- Reg. Civil Suit No.21/2026

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

Name of Stenographer:- Smt. M. N. Patil
Court Name :- JT. Civil Court, Rajapur.
Date of Decision :- 04-09-2025
Order signed by P.O. on :- 17-09-2025
Order uploaded on :- 17-09-2025 "